# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २९/०९/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दिनांक ०७/०९/२०१६ रोजीचे कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०९/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत आले.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| २ | विरार पूर्व प्रभाग समिती सी मध्ये सर्व्हे नं. १६ येथील बहुउद्देशिय इमारती मधील पहिल्या मजल्याच्या फर्निचरचे काम करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विरार (पू.) प्रभाग समिती सी, मध्ये सर्व्हे नं. १६ मधील बहुउद्देशीय इमारतीचा विकास करण्यांत आलेला आहे. सदर ठिकाणी प्रभाग समिती सी कार्यालय व इतर विभाग बसविण्यांत येणार आहेत. त्यासाठी पहिल्या मजल्याच्या अंतर्गत फर्निचरचे काम करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी रू. २४,०९,५१३/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेतुन टेबल, खुर्च्या व कपाटाचा खर्च करण्यांत येवू नये. वार्षिक मंजूर निविदा धारकांकडून सदर मटेरीअल खरेदी करण्यांत यावे व इतर अंतर्गत फर्निचरचे (पार्टीशिअन/P.O.P/carpet वगैरे) होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे. सदर कामी ई-निविदा कार्यप्रणालीद्धारे निविदा दर मागविणेंत यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नव्याने अंतर्भुत झालेल्या प्रभाग समिती (जी), प्रभाग समिती (एच) विभागीय कार्यालया अंतर्गत शालेय कला क्रिडा महोत्सव २०१६ चे आयोजन व जिल्हा स्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा त्याकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून सन २०१६/१७ च्या अर्थसंकल्पात प्रभाग समिती (एच) नवघर माणिकपूर विभागाचे लेखाशिर्ष क्रीडा विषयक राखीव तरतुदी अंतर्गत आंतरशालेय कला - क्रीडा महोत्सवासाठी रक्कम रू. २५ लक्षची तरतुद केलेली आहे. तसेच प्रभाग समिती (जी) वालीव विभागासाठी रू. १५ लक्ष ची तरतूद केलेली आहे. सदर कार्यक्रमाचे स्पर्धेचे आयोजन व साहित्य खरेदी करीता (रू. ३० लक्ष) खर्च अपेक्षित आहे. सदरची कामे सन २०१६/१७ च्या वार्षिव निविदेतुन मंजूर दराने करुन घेण्यास तसेच जिल्हा स्तरीय शरीर सौष्ठ स्पर्धेसाठी राज्याच्या विविध भागातुन स्पर्धक येणार असल्याने सात वेगवेगळ्या गटात विभागलेल्या या स्पर्धेतील गटनिहाय स्पर्धकांना व प्रत्येक गटातील विजेत्यांना रोखीने मानधन, मेडल, महापौर चषकासह रोख रक्कम आणि कला-क्रीडा स्पर्धेसाठी असलेल्या पंचाचे प्रत्येकी रू. ७५०/- प्रमाणे रोखीने मानधन तसेच पाहुणे कलाकार यांना प्रवास भत्ता मानधन रोखीने देण्यास आणि वाय.एम.सी.ए. माणिकपूर सभागृहाचे भाडे व अनषंगिक येणाऱ्या खर्चास व बिले अदा करण्यास ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्री. किशोर पाटील** |
| ४ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान | **ठराव :-** वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. विषयांकित कामी पश्चिम रेल्वेच्या पॅनलवरील नियुक्त |

| | | |
|---|---|---|
| | महाअभियान सुर्या (टप्पा-३) पाणी पुरवठा योजना<br>नालासोपारा - विरार दरम्यान पश्चिम रेल्वेच्या ५६/१२ बी - १३ येथे जलवाहिनी रेल्वे क्रॉसींगसाठी भुमीगत अंथरणेकामी सल्लागाराची नेमणुक करण्यास मान्यता मिळणेबाबत. | मे. राईट्स लिमिटेड (भारत सरकार उपक्रम), मुंबई यांची प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (P.M.C.) म्हणून नेमणूक करण्यास व खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले   सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती ए क्षेत्रातील विविध रस्त्यांवर आवश्यकतेनुसार पट्टे मारणेकामी तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.७१,०४,८०३/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील   सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| ६ | बिनतारी संदेश यंत्रणेची सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव / निर्णय** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे बिनतारी संदेश यंत्रणा वापरात आहे (१) बेस स्टेशन- १७ नग (२) मोबाईल स्टेशन- १५ नग (३) वॉकी टॉकी हँण्ड सेट-४५ नग (४) रीपीटर स्टेशन टॉवर- २ नग. सदर यंत्रणा ही आपत्कालीन स्थितीत व दैनंदिन वापरात असल्याने हिची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती, निगा व काळजी राखणे गरजेचे आहे. परंतु ई निविदा प्रक्रिया करण्यांस बराच कालावधी निघून जातो व जुन्या निविदांना मुदतवाढ दयावी लागते याकरीता ३ वर्ष कालावधीसाठी ई निविदा मागविणे योग्य होईल. त्याकरीता महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग, आपत्कालीन विभाग व अग्निशमन विभागातील अग्निशमन केंद्रे व अग्निशमन वाहनांमध्ये असलेल्या बेस स्टेशन वरुन अग्निशमन वाहन चालक व फायरमन यांना दैनंदिन व आपत्कालीन प्रसंगी  संपर्क साधण्यासाठी बिनतारी संदेश यंत्रणेचा  वापरासाठी वार्षिक दराचा तीन वर्ष कालावधीकरीता ई- निविदा मागवून दरकरार करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु. ३,००,०००/- खर्चास हि सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील   सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| ७ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व प्रभाग समिती कार्यालयातील वातानुकुलीत यंत्र, वॉटर कुलर, आर.ओ.वॉटर प्युरिफाय व शवागृहातील शवपेट्या यांची वार्षिक ठेका पद्धतीने साहित्यासह देखभाल | **ठराव :-** सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व प्रभाग समिती कार्यालयातीस वातानुकुलीत यंत्र, वॉटर कुलर, आर.ओ.वॉटर प्युरिफाय व शवागृहातील शवपेट्या यांची वार्षिक ठेका पद्धतीने साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणेकामी प्राप्त झालेल्या निविदांपैकी १) झेनित रेफ्रिजिरेशन यांची ०१/१) विन्डो ए.सी- ३) २ टन :- ४२५ रु., ०१/२) स्प्लिट ए.सी- १) १ टन :- ४२५ रु. २) २ टन :- ४२५ रु. ३) ३ टन :-४२५ रु. २) रीवा एअर सोल्युशन यांची ३) वॉटर कुलर -१) अर्धा टन :- ३२५ रु. २) पाऊण टन :- ३२५ रु. ३) १ टन :- ३२५ रु. ४) दीड टन :- ३२५ रु., ५) दोन टन :- ३२५ रु. , ०१/ ४) शवागारातील ए.सी. - १) १.५ टन :- ६८० रु. २) २ टन:- ६८० |

| | | |
|---|---|---|
| | दुरुस्ती करणे कामाची संविदा करणेबाबत. | रु.,०१/५)आर.ओ.वॉटर प्युरीफायर - १) १०० लि.प्रती तास :- ३५४ रु., .०२/२) शवागरातील पेटी देखभाल व दुरुस्ती- १) केम इंजिनिअरींग कंपनी यांची १.०५ टन ३ डेड बॉडी कंपनीची शवागार पेटी :- ५९१ रु.प्रती वर्ष, २) २ टन क्षमतेची शवागार पेटी :- ५९१ प्रती वर्षी, ३) के.के.ब्रदर्स :- ०१/१) विन्डो ए.सी.- १) १ टन ३८५ रु. २) दीड टन ४१० रु. या कमी दराच्या निविदा धारकांची निविदा मंजूर करुन निविदाकारांसोबत संविदा करणेकामी तसेच याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजित नाईक सूचक :- मा.श्री. किशोर पाटील** |
| ८ | श्री. संतोष नारायण घोलप (रखवालदार) सभागृह वसई-विरार शहर महानगरपालिका ह्यांच्या वडिलांचे वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याबाबत मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** प्रस्तावाचा मजकूर पाहता श्री. संतोष नारायण घोलप (रखवालदार) यांचे वडील नारायण घोलप दि. १६/१०/२०१५ ते ३१/१०/२०१५ या कालावधीत कार्डीनल ग्रेशस मेमोरीअल हॉस्पीटल बंगली, वसई येथे दाखल करुन घेतल्याकामी झालेला खर्च रक्कम रु. १,५२,६५९/- मधून १०% कपात करुन १,३६,८९४/- रुपयाची प्रतिपुर्ती करणेकामी ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| ९ | वॉर्ड नं. ७९ (११५) मध्ये कामण येथील कामण मेन रोड ते मोरी ब्रिजपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणेकामी मंजुर निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मंजुरी देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे. सी.एस.मोहिते यांची ५.२०% कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी तपासून मंजूरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. सी.एस.मोहिते यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |